अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २५७ ■ गुरूवार दि.५ जून २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 257 ■ Thursday Dt.5 June 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

## बीड जिल्ह्यात मागील दोन वर्षांत अनेक सहकारी पतसंस्था आणि अर्बन मल्टिस्टेट पतसंस्थांमध्ये मोठे घोटाळे?

# साईराम अर्बन ची ५३ कोटींची संपत्ती सिल करण्यासाठी पाठवला प्रस्ताव

## पतसंस्थेच्या मालमत्तेचा लिलाव झाल्यास ठेविदारांना लवकर ठेवी मिळणार; ठेविदारांच्या आशा अपेक्षा आता वाढल्या?

## २०२३ मध्ये आर्थिक अडचणींमुळे पतसंस्थेविरोधात झाले होते गुन्हे नोंद

बीड । प्रतिनिधी

आर्थिक अनियमिततेनंतर बंद पडलेल्या साईराम अर्बन मल्टिस्टेट पतसंस्था प्रकरणात अध्यक्ष व संचालकांच्या ५३ कोटींच्या मालमत्तांचा एमपीआयडीचा प्रस्ताव शासनाकडे आर्थिक गुन्हे शाखेने पाठवला आहे. तर, जिजाऊ मल्टिस्टेटचाही ३ कोटींच्या मालमत्तांचा पुरवणी प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे पैसे मिळण्याच्या ठेवीदारांच्या अशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत.

बीड जिल्ह्यात मागील दोन वर्षांत अनेक सहकारी पतसंस्था आणि अर्बन मल्टिस्टेट पतसंस्थांमध्ये घोटाळे झाले आहेत. ज्ञानराधा, जिजाऊ, साईराम, राजस्थानी या प्रमुख पतसंस्थांचे घोटाळे मोठ्या प्रमाणावर गाजले. बीड येथील साईराम मल्टिस्टेटमध्येही नोव्हेंबर २०२३ मध्ये आर्थिक नियमितता समोर आली होती. साईरामपूर्वी जिजाऊ, ज्ञानराधा या मोठ्या पतसंस्था बुडाल्याने ठेवीदारांनी साईराम अर्बनमधूनही ठेवी काढण्यासाठी गर्दी केली होती. साईराम अर्बनच्या बीड, जालना, धाराशिव आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात २१ शाखा होत्या. जिजाऊ मल्टिस्टेट प्रकरणात यापूर्वीच एमपीआयडीचा प्रस्ताव मंजूर झाला आहे. मात्र त्यात बबन शिंदे व कुटुंबीयांच्या काही मालमत्तांचा समावेश नव्हता. कृती समितीने ही बाब आर्थिक गुन्हे शाखेच्या निदर्शनास आणून दिली होती. त्यानंतर पुन्हा ३ कोटींच्या ६ मालमत्तांचा पुरवणी प्रस्ताव मान्यतेसाठी पाठवला गेला आहे. जिल्ह्यात जिजाऊ, ज्ञानराधा या पतसंस्थांचे एमआयडीचे प्रस्ताव मंजूर झाले आहेत. जिजाऊ व ज्ञानराधाच्या काही मालमत्तांची जप्ती झाली असून त्यांच्यावर बोजा चढवला गेला आहे. मात्र आता या मालमत्तांचा लिलाव कधी होणार, प्रत्यक्षात ठेवीदारांना पैसे कधी मिळणार, याकडे ठेवीदारांचे लक्ष लागले आहे. यातील १६ शाखा बीड जिल्ह्यात होत्या. २०० कोटी रुपयांच्या ठेवी या पतसंस्थेत होत्या. पतसंस्था आर्थिक अडचणीत सापडल्यानंतर अध्यक्ष शाहीनाथ परभणे यांनी अनेक ठेवीदारांच्या ठेवी परत केल्या. मात्र, ठेवी मागण्याचे सत्र सुरूच असल्याने शेवटी एक-एक करत पतसंस्थेच्या सर्व शाखा बंद पडल्या. शाहीनाथ परभणे व संचालकांवर गुन्हा नोंदीचे सत्र सुरू झाले.

सुरुवातीला व्हिडिओच्या माध्यमातून

▶ पान २ वर




## ट्रॅक्टर चोरी करणाऱ्या टोळीतील आरोपीस केले जेरबंद

बीड । प्रतिनिधी

दिनांक ३०/०५/२०२५ रोजी फिर्यादी नामे विष्णु रामकिसन तांबडे रा.चिंचवण ता.वडवणी जि.बीड यांनी फिर्याद दिली की, दि.२६/०५/२०२५ फिर्यादी यांचा पुतण्या याने फिर्यादीच्या शेतामध्ये दिवसभर ट्रॅक्टरने शेतनांगरट करुन रात्री ०७.०० वा सुमारास ट्रॅक्टर गोठयाजवळ उभा केला होता. दि.२७/०५/२०२५ रोजी सकाळी ०६.००वा. सुमारास फिर्यादी यांचा भाऊ याने फोनकरुन सांगीतले की, काल रात्री गोठयाजवळ नांगरासह उभा केलेला ट्रॅक्टर हा गोठयाजवळ दिसत नाही. फिर्यादी याने चिंचवण- धारुर-केज भागात ट्रॅक्टरचा शोध घेतला असता तो मिळुन आला नाही. या वरुन सदरचा ट्रॅक्टर कोणीतरी अज्ञात चोरांनी चोरी केला असल्याचे फिर्यादी यांची खात्री झाल्याने पोलीस ठाणे वडवणी येथे गुरनं १४७/२०२५ कलम ३०३(२) इछड प्रमाणे ट्रॅक्टर चोरीचा गुन्हा नोंद केला होता.

मा.पोलीस अधीक्षक बीड यांनी उघडकीस न आलेल्या गुन्हयाचा आढावा घेवुन उघडकीस न आलेले वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड यांना आदेशीत केले होते. त्यावरुन पोलीस उप-निरीक्षक श्री. महेश विघ्ने यांनी अभिलेखावरील

▶ पान २ वर



## खरात आडगाव जलजीवनचे काम निकृष्ट

### गुत्तेदार इंजिनियर च्या संगणमताने लाखोंचा भ्रष्टाचार गावकरी लवकरच करणार आंदोलन

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यात खरात आडगाव येथे गावाला पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळावे म्हणून जलजीवन अंतर्गत योजना राबवण्यात आली मात्र सदर योजनेत जल जीवन चे काम निकृष्ट करण्यात आले असून सदर योजनेच्या गावात कुठलाच फायदा होत नाही. सदर योजनेमध्ये इंजिनियर आणि गुत्तेदार यांनी लाखो रुपयाचा भ्रष्टाचार केल्याने खरात आडगावकर आणखीनही पाण्यापासून वंचित आहेत गुत्तेदार आणि इंजिनियर यांच्यावर चौकशी करून तात्काळ कारवाई करा या मागणीसाठी गावकरी आंदोलन करणार असल्याचे कळत आहे.

माजलगाव तालुक्यातील खरात आडगाव बहुजन समाजाचा गाव खरात आडगाव मधील लोकसंख्या एकूण जवळपास पाच हजाराच्या पुढे आहे. गाव मोठा असल्याने गावाचा कायमस्वरूपी पाणी प्रश्न सोडवण्यासाठी बीड जिल्हा परिषदेने जल जीवन

▶ पान २ वर



# ना जातीचा ना धर्माचा एक हात मदतीचा महाराष्ट्र आधार सेनेची जनसेवेसाठी स्थापना

## दीपक थोरात यांच्या कार्याचे बीड जिल्ह्याबाहेरही कौतुक : राष्ट्रवादीचे युवा नेते रणवीर काका पंडित

## गेल्या पंधरा वर्षापासून दीपक जनसेवेमध्ये काम करत आहे : ॲड. शफीक भाऊ

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याच्या कानाकोपऱ्यात सध्या ती परिस्थिती पाहता जातीचा विस्तारला जात आहे या जातीच्या विषयाच्या प्रभावाने बीड जिल्ह्याची मोठी बातमी होत आहे यातच आता महाराष्ट्र आधार सेनेची स्थापना करण्यात आलेली आहे महाराष्ट्र आधार सेनेच्या ब्रीद वाक्याने बीड जिल्ह्यातील जनतेकडून व महाराष्ट्रातील जनते कडून थाप मिळत आहे ना जातीचा ना धर्माचा एक हात मदतीचा या ब्रीदवाकयामुले जाती भेदाच्या विषामुळे बीड जिल्हा बदनाम झालेला आहे त्यामुळे महाराष्ट्र आधार सेनेने कुठल्याही महापुरुषांच्या नावावर किंवा रंग बघून सामाजिक संघटना काढली नाही तर ही सामाजिक संघटना महाराष्ट्र सह बीड जिल्ह्यातच नव्हे तर अखंड महाराष्ट्रातील युवकाना सोबत घेऊन काम करणार आहे. यामध्ये प्रामुख्याने पाहिले तर बीड जिल्ह्यामध्ये ग्रामीण भागातून येणाऱ्या प्रत्येक माणसाच्या मदतीला जाऊन जाणारा दीपक थोरात सर्व समाजाच्या लोकांना सोबत घेऊन संघटना स्थापन करत आहे. नक्कीच या संगटनेला चांगले दिवस येतील दीपक थोरात हे जनसेवेसाठी आम्ही जाती बाजूला ठेवून काम करणारे आहोत असे प्रतिपादन यावेळी युवा नेते रणवीर पंडित यांनी म्हटले आहे तर आम्ही सोबत राजकीय जीवनामध्ये राजकीय पदावरती काम केलेले आहे. दीपक थोरात कडे आज संघटनेच्या माध्यमातून एक रुपया न देता हजारो लोक जमा होतात त्यामुळे दीपक ची संघटना ही महाराष्ट्रामध्ये व बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये उभारणी नक्कीच घेईल असे प्रतिपादन शफिक भाऊ यांनी केले आहे तर गणेश बापू थोरात यांनी दीपक आमच्या परिवारातील सर्वसामान्यांच्या मदतीला जाऊन जाणारा एकमेव माणूस आहे तर गोपाल धांडे यांनी शुभेच्छा दिल्या.

यावेळी महाराष्ट्र आधार सेनेला शुभेच्छा दिल्या व्यासपीठावरती राष्ट्रवादीची युवा नेते रणवीर पंडित एमआयएमचे जिल्हाप्रमुख राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष धांडे महाराष्ट्र आधार सेनेचे कार्याध्यक्ष उद्धव आरे अमोल मुजमुले बाबू हातागळे लहुजी साळवे चे लाला दुनघव विजय चांदणे आमदार संदीप क्षीरसागर यांचे समर्थक करने भैया लोंढे काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे माजलगाव तालुक्यातील ब्रह्म गावचे उपसरपंच राधे कांबळे युवा नेते शाहीर युवराज ढगे बाप्पा कसबे लोकशाही पत्रकार संघाचे अध्यक्ष भागवत वैद्य आझाद समाज पार्टीचे आशिष कुमार चव्हाण पंडित मित्र मंडळाचे काशिनाथ आढागळे अभिजीत देडे बापू किरवले भाऊसाहेब मोमीन अशोक आबा वाघमारे जावेद भाई जमीर भाई अमोल आढागळे देवराज थोरात राधाकिसन शिंदे लखन लांडगे बाळू आव्हाड अनिल आव्हाड कारण सरवदे मिलिंद पाटोळे नाना पाटोळे अनिल कुचेकर सतीश हनवते किशोर मुजमुले संदीप वासलेकर अमोल मुजमुले सतीश हनवते कारण सर्व दे बालाजी इचके बाबू हातागळे अनिल आव्हाड अरुण आव्हाड उमेश आव्हाड राजाभाऊ हातागळे विलास कारके पिंटू आडागळे राम आडगळे वशिष्ठ आठवे काशिनाथ आडगळे संचार उमाप राजू नाडे शिवाजी आव्हाड बाबू आवड अजित गालफडे अभिषेक आडगळे बाबू मुजमुले भैया थोरात दादाराव गायकवाड राहुल वैरागे सुनील थोरात अजीम भाई लखन लांडगे सरपंच संतोष हातागळे कपिल जोगदंड आदींची उपस्थिती होती.






> महाराष्ट्र आधार सेनेची स्थापना जातीयवादाच्या विरोधामध्ये काम करणार आहे बीड जिल्ह्यामध्ये नात जातीचाना धर्माचा एक हात मदतीचा म्हणून या संघटनेचे ब्रीद वाक्य आहे आणि ही संघटना ही सर्वसामान्यांच्या अडीअडचणीसाठी सदैव कटिबद्ध राहील. ला जातीचा धर्माचा ही विरोधात घेऊन आणि आज महाराष्ट्रभर फिरणार आहोत तर यावेळी मात्र कुठलाही रंग किंवा कुठले महापुरुषाचे विचारावरती कुणाचेही मनामध्ये द्वेष किंवा कोणावरती टीका करणार नाहीत आम्ही आमच्या कामातून संबंधित जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी लढा उभारणार आहोत येणाऱ्या काळामध्ये बीड जिल्ह्यातील १८ जिल्हाप्रमुख यांची निवड करण्यात येणार आहे.

# वैद्यनाथ मंदिर सुरक्षा अलर्ट

## दीड लाखाचा मोबाईल व ५० हजारांची रोकड असणारी विसरलेली बॅग भाविकाचा शोध घेऊन केली परत

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

बारा ज्योतिर्लिंगापैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैद्यनाथ मंदिरात देशाच्या कानाकोपऱ्यातून भाविक दाखल होत असतात. मंदिर व परिसरात सुरक्षेच्यादृष्टीने आवश्यक ती सर्व व्यवस्था लावण्यात आलेली आहे. संपूर्ण परिसर सीसीटीव्हीच्या निगराणीत असतो. त्याचप्रमाणे या ठिकाणी स्वतंत्र पोलीस चौकीही नेमण्यात आलेली आहे. या ठिकाणी भाविकांकडून कधी कधी आपले किंमती सामान बॅगा, मोबाईल आदी विसरतात. असाच एक प्रकार आज (दि.४) सकाळी घडला. मात्र येथील सुरक्षारक्षक व पोलीस चौकीतील पोलीसाने या भाविकाचा शोध घेत बॅग सुपूर्द केली.



आंध्रप्रदेशातील तिरुपती येथील महादेवी कोंडारेड्डी हे वैद्यनाथाच्या दर्शनासाठी आले होते. वैद्यनाथ मंदिरात त्या दर्शनासाठी गेल्या मात्र दर्शन घेऊन गाभाऱ्यातच त्या आपली हॅण्डबॅग विसरून बाहेर आल्या. मंदिर परिसरातून ते निघूनही गेले. दरम्यान या ठिकाणी ड्युटीवर असणाऱ्या वैद्यनाथ मंदिरच्या सुरक्षा सेवेकरीकोंडा कांबळे, प्रियंका सरवदे, यांनी ही हॅण्डबॅग सुरक्षा ऑफिसचे गंगाराम डोणे यांच्याकडे जमा केली. वैद्यनाथ मंदिर पोलिस चौकीचे इंचार्ज स.पो. उपनि. राजाराम शेळके यांनी या भाविकांचा तातडीने शोध घेतला व या भाविकांना सहीसलामत बॅग परत करण्यात आली. विशेष म्हणजे या बॅगमध्ये एक लाख साठ हजार रुपये किंमतीचा ॲपल कंपनीचा मोबाईल, रोख ५० हजार रुपये होते. आपले किंमती सामान असलेली ही बॅग सहीसलामत वापस केल्याबद्दल या भाविक महिलेने सुरक्षा कर्मचारी व मंदिरप्रशासनाचे आभार व्यक्त केले.

**भाविकांनी लॉकरचा उपयोग करावा**

दरम्यान, मंदिर परिसरात नेहमीच वर्दळ असते. मंदिर प्रशासनाने मंदिर परिसरात आपल्या बॅगा, मोबाईल व किमती सामान, साहित्य ठेवण्यासाठी लॉकरची सुविधाही उपलब्ध करून दिलेली आहे. मात्र तरीही काही भाविक लॉकरचा उपयोग न करता मंदिर परिसरात इतरत्र आपले सामान ठेवतात. त्यामुळे अशा घटना घडू शकतात. परंतु भाविकांनी लॉकर च्या सुविधेचा उपयोग करावा व आपले साहित्य बॅगा, सामान लॉकरमध्येच ठेवावे असे आवाहन वैद्यनाथ मंदिर प्रशासनाने केले आहे.

# दक्षिण आफ्रिकेमधील कॉम्रेड मॅरेथॉन ला बीड जिल्ह्यातून योगा ग्रुपचे तीन रनर धावणार

बीड । प्रतिनिधी

मॅरेथॉन क्षेत्रातील सर्वात अवघड समजली जाणारी स्पर्धा असलेली कॉम्रेड मॅरेथॉन ही दक्षिण आफ्रिका मध्ये आयोजित करण्यात येते. यामध्ये ९० किलोमीटर रण पूर्ण करून मॅरेथॉन जिंकायची असते. या साठी मध्ये बीड जिल्ह्यातून योगा ग्रुपचे तीन जण धावणार आहेत. हे रनर ३ जून रोजी बीड मधून दक्षिण आफ्रिकेला रवाना होणार असून ८ जून रोजी ही स्पर्धा आहे. या स्पर्धेत १२ तासांमध्ये ९० किलोमीटर रन करून ही स्पर्धा पूर्ण करायची असते. ही स्पर्धा जगातील सर्वात अशी अवघड आणि कठीण मॅरेथॉन मानले जाते. याआधी ही मॅरेथॉन बीडच्या योगा ग्रुपचे संतोष भोकरे आणि हरिभाऊ ठोंबरे तसेच पोलीस उपाध्यक्ष साईनाथ ठोंबरे यांनी पूर्ण केलेली आहे. या वर्षाच्या मॅरेथॉन मध्ये बीडचे डॉक्टर संजय जानवळे, डॉक्टर विश्वास गवते व श्री हरिभाऊ ठोंबरे आणि पुण्यामधून पोलीस उपाध्यक्ष साईनाथ ठोंबरे हे धावणार आहेत. या स्पर्धेसाठी मागील सहा महिन्यांपासून हे रनर सराव करीत असून येत्या ८ जून रोजी दक्षिण आफ्रिकामधील पीटर्सबर्ग शहरातून ९० किलोमीटरची ही स्पर्धा सुरू होईल. यामध्ये जगभरातून १२९ देशाचे रनर्स भाग घेणार आहेत. त्यामध्ये भारतामधून ४१५ स्पर्धक भाग घेणार आहेत. सगळ्या मॅरेथॉन मध्ये कॉम्रेड मॅरेथॉन म्हणजे चांगल्या रनर साठी कुंभमेळ्याची पर्वणी असते. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या रनर यांना आज योगा ग्रुपच्या सर्व सदस्यांनी शुभेच्छा दिल्या.



# धारूर तालुक्यात बाजरीचे पीक पाण्याखाली जाण्याच्या मार्गावर

धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील कुंडलिका तलाव उपळी पाण्याने १००/भरण्याच्या मार्गावर आहे. यावर्षी बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील उद्धव कुंडलिका मे महिन्यातच ओव्हर फ्लोहोऊन त्याचे पाणी कूंडलिका तलावात सोडण्यात आले आहे. उर्ध्व कुंडलिका पाण्याने शंभर टक्के भरले आहे त्यामुळे त्या तलावाचे दोन दरवाजे खुले करून पाणी कुंडलिका नदीपत्रा मध्ये सोडण्यात आले आहे. पाण्याची आवक वरचेवर वाढत आहे त्यामुळे कुंडलिका तलाव उकळी हा पाण्याने शंभर टक्के पूर्ण भरण्याच्या मार्गावर आहे तलावाची पाणी पातळी रोज १० फूट वाढत असून या परिसरातील शेतकऱ्यांनी गाळपेऱ्या मध्ये बाजरीची पीक व उन्हाळी मुगाचे पिकं घेतली आहेत ती पिके सध्या पाण्याखाली जाऊ लागली आहेत.

कमीत कमी रोज दहा फूट पाणी या परिसरामध्ये वाढत असल्यामुळे तलावातील खोल खोल असणारे खड्डे पाण्याने पूर्ण भरले असून उथळ माथ्यावर सध्या पाणी शिरण्याच्या मार्गावर आहे पाण्याचा जोर वाढल्यास येत्या दहा ते बारा



दिवसांमध्ये कुंडलिका तलाव पाण्याने ओव्हरफ्लो होण्याच्या मार्गावर आहे. सध्या या तलावातील पाणीसाठा ७५ टक्के जवळ वाढला आहे. हा तलाव २५ टक्के भरने बाकी असून त्यामुळे या परिसरातील शेतकऱ्यांचा पाण्याचा व पिण्याचा पाण्याचा प्रश्न मिटलेला आहे परंतु शेतकऱ्यांनी पेरलेल्या उन्हाळी बाजऱ्या या पूर्णतः पाण्याखाली जाणार आहेत त्यामुळे शेतकऱ्याची आर्थिक नुकसान ही होणार आहे. यावर्षी मे महिन्यामध्ये तलावातील पाणी पातळी वाढल्यामुळ लवकरच तलाव १००% पूर्ण होतील असा विश्वास या परिसरातील शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे.

# यशाच्या शिखरावर टिकून राहण्याची गरज : चेतना तिडके

अंबाजोगाई । प्रतिनिधी

यशाच्या शिखरावर पोहोचल्यावर कधी अपयश आले तर खचून न जाता परत उभे राहिले पाहिजे. आयुष्याच्या शिखरावर पोहोचल्यावर मोडून पडू नका असे प्रतिपादन अतिरिक्त पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांनी केले त्या बीड सहोदया संस्थेतर्फे पोदार इंटरनॅशनल स्कूल आंबेजोगाई येथे आयोजित दहावी व बारावी च्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला पोदार इंटरनॅशनल स्कूल अंबेजोगाई चे प्राचार्य कीर्तीकुमार देशमुख यांनी प्रास्ताविक केले त्यानंतर शारदा इंग्लिश स्कूल केज चे प्राचार्य सोनल मिश्रा यांनी बीड सहोदया चा अहवाल सादर केला. या सोहळ्यासाठी प्रतिष्ठित अतिथी प्रा.अभिजीत लोहिया, ॲड. संतोष पवार, आणि फिजिक्सवाला अकॅडमीचे डॉन बॉस्को जोसेफ यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात अनेक गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि शिक्षणक्षेत्रातील व्यक्तींची



उपस्थिती या कार्यक्रमाला शोभा देत होती. मुख्य वक्ता चेतना तिडके यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना जीवनाबद्दलचे महत्त्वाचे विचार मांडले. त्यांनी प्रसिद्ध अमेरिकन कवी रॉबर्ट फ्रॉस्टच्या कवितेच्या ओळींचा संदर्भ देत विद्यार्थ्यांना जीवनसंघर्षाबद्दल प्रेरणा दिली. स्वतःचे सकारात्मक आणि नकारात्मक गुण लिहून काढा आणि त्यावर ठोस काम करा. सकारात्मक गुणातून आपल्याला नवी ऊर्जा मिळते आणि ती आपल्याला पुढे नेऊन जाते, असा व्यावहारिक सल्ला त्यांनी दिला.

प्रा.अभिजीत लोहिया यांनी विद्यार्थ्यांना संपूर्ण व्यक्तिमत्त्व विकासाचे महत्त्व पटवून दिले. अभ्यासाबरोबर आरोग्यावर सुद्धा लक्ष केंद्रित करावे. शारीरिक आणि मानसिक आरोग्याशिवाय केवळ पुस्तकी ज्ञान कामी येत नाही, असे त्यांनी प्रतिपादन केले. आधार माणुसकीचा फाऊंडेशनचे अध्यक्ष ॲड. संतोष पवार यांनी विद्यार्थ्यांच्या भावी जीवनातील आव्हानांकडे लक्ष वेधले. दहावी आणि बारावी नंतरचा प्रवास हा खरोखरच खडतर प्रवास आहे. पुढील शिक्षणासाठी कुटुंबापासून दूर जावे लागणार आहे,

त्यामुळे समाजामध्ये कसे वागावे, कसे जगावे यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे, असे त्यांनी महत्त्वाचे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमातील सर्वात भावनिक क्षण म्हणजे बीड जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या शौर्य मुगदिया या विद्यार्थ्याच्या आई डॉ.रेखा मुगदिया यांनी व्यक्त केलेले विचार होते. त्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हटले की विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीचे क्षेत्र निवडावे आम्ही त्याचे पालक दोघेजण डॉक्टर असून आमचा मुलगा इंजीनियरिंगची तयारी करतो. बीड सहोदयाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

एमआयटी शाळेचे प्राचार्य सागर राऊत यांनी बीड सहोदया ऑलिम्पियाडचा तपशीलवार अहवाल सादर केला. या कार्यक्रमात बीड सहोदया ओलंपियाड मधून जिल्ह्यात प्रथम द्वितीय आणि तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांचाही त्यांच्या पालकांसमवेत सत्कार करण्यात आला. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोदार इंटरनॅशनल स्कूल आंबेजोगाईच्या अनुभवी शिक्षिकेने अत्यंत कुशलतेने केले. शाळेचे प्रशासकीय अधिकारी प्रताप रसाळ यांनी कार्यक्रमाला योग्य गती दिली. कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन ईगलवूड इंग्लिश स्कूल माजलगावचे प्राचार्य सत्यजित कांजळकर यांनी केले.

# प्रा.एस.के.जोगदंड यांच्या जीवनचरित्रावरील 'सम्यक पांथस्थ आबा' या गौरवग्रंथाच्या प्रकाशन समारंभाचे आयोजन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

दलित युवक आघाडीचे लढाऊ शिलेदार, वंचित बहुजन आघाडीचे जेष्ठ नेते, पुरोगामी परिवर्तनवादी चळवळीतील कार्यकर्त्यांचे प्रेरणास्थान आणि अंबाजोगाई येथील योगेश्वरी शिक्षण संस्थेतील इंग्रजी विषयाचे सेवानिवृत्त प्रा.एस.के.जोगदंड यांच्या जीवनचरित्रावरील 'सम्यक पांथस्थ आबा' या गौरवग्रंथाचा प्रकाशन समारंभ रविवार, दि. ८ जून २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता शहरातील विलासराव देशमुख न.प. सभागृह, अंबाजोगाई येथे आयोजित करण्यात आला आहे. तरी या कार्यक्रमास अंबाजोगाई व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

गौरवग्रंथ प्रकाशन समारंभाच्या अध्यक्षस्थानी डॉ.सुरेश खुरसाळे (माजी अध्यक्ष, योगेश्वरी शिक्षण संस्था, अंबाजोगाई.) तर गौरवग्रंथाचे विमोचन ज.वि.पवार (ज्येष्ठ विचारवंत व आंबेडकरी चळवळीचे भाष्यकार, मुंबई.) यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. तसेच गौरवग्रंथावर भाष्यकार म्हणून प्रा.डॉ.प्रल्हाद लुलेकर (प्रसिद्ध साहित्यिक, विचारवंत, छत्रपती संभाजीनगर.), प्रा.पी.जी.जोगदंड (माजी सदस्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने समिती, मुंबई.) आणि मंगलताई खिंवसरा (ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, छत्रपती संभाजीनगर.) हे आपले मौलिक विचार व्यक्त करणार आहेत. प्रा.एस.के.जोगदंड यांच्या जीवनचरित्रावरील 'सम्यक पांथस्थ आबा' या गौरवग्रंथाचे संपादन ज्येष्ठ पत्रकार तथा माध्यम तज्ज्ञ प्रा.जयदेव डोळे, मंगलताई खिंवसरा, प्रा.नानासाहेब गाठाळ, लंकेश वेडे, मुक्त पत्रकार अमर हबीब, डॉ.वाल्मिक सरवदे, सुरेश पाटील, राम दोतोंडे यांनी केले आहे. तर गौरवग्रंथ समिती मध्ये ज.वि.पवार, शांताराम पंदेरे, डॉ.सुरेश खुरसाळे, डॉ.साहेबराव गाठाळ, अण्णा खंदारे, अशोक देशमुख, चंद्रशेखर बर्दापूरकर, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलसचिव प्राचार्य डी.ए.चव्हाण, सुखदेव भुंबे, उपप्राचार्य गौतम गायकवाड, डॉ.नरेंद्र काळे, प्रा.अरूंधती पाटील, प्रा.माणिक कांबळे, रमेशभाई खंडागळे, रामभाऊ पेरकर या मान्यवरांचा समावेश आहे. तरी गौरव ग्रंथ प्रकाशन समारंभास आवर्जुन उपस्थित राहावे अशी विनंती व आवाहन प्रा.डॉ.चेतन सरवदे, चेतन पब्लिकेशन्स, सुधाताई जोगदंड, उत्तम जोगदंड, ॲड.विशाल जोगदंड, समीर मोरे यांनी केले आहे.

**पूर्वतयारी संदर्भात बैठकीचे आयोजन**

गौरवग्रंथाचा प्रकाशन समारंभाच्या आयोजनाच्या पूर्वतयारी संदर्भात 'अंबारी' शासकीय विश्रामगृहात बुधवार, दिनांक ४ जुन रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीचे अध्यक्षस्थान माजी मुख्याध्यापक लंकेश वेडे यांनी भुषविले. तर या बैठकीस सुखदेव भुंबे, प्रा.डॉ.शंकर वाघमारे, एम.वाय.काळे, संभाजीराव सोनवणे, प्रा.संभाजीराव बनसोडे, व्यंकटराव वेडे, ॲड.वसंतराव हजारे, शशिकांत सोनकांबळे, प्रा.एम.बी.चव्हाण, डॉ.किरण चक्रे, ॲड.डी.आर.गोरे, उत्तम जोगदंड, दिलीप वैद्य, संजय भोसले, ॲड.विशाल जोगदंड, कल्याण जोगदंड, ॲड.ए.एस.धाईजे, प्रसेनजीत मस्के, संदिपान पोटभरे हे उपस्थित होते. बैठकीचे सुत्रसंचालन डॉ.किरण चक्रे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार सुखदेव भुंबे यांनी मानले. सदरील बैठकीत कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विविध जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले. अशी माहिती माजी मुख्याध्यापक लंकेश वेडे यांनी दिली आहे.


# राज्यात हवामानाची गती मंदावली

मुंबई । प्रतिनिधी

राज्यात मान्सूनपूर्व हवामानाची गती मंदावली असून, राज्यात पावसाचा जोर १० ते १२ जूनदरम्यान कमी-अधिक प्रमाणात राहण्याची शक्यता असून सध्या मान्सूनच्या वाटेत अडथळा निर्माण झालेला आहे.

हवामान विभागाने केवळ हलक्या सरींचा अंदाज वर्तवला असतानाही मुंबईत पहाटेपासून मुसळधार पावसाने हजेरी लावली. मंगळवारी संध्याकाळपासूनच रिमझिम सरी सुरू होत्या, मात्र बुधवारी पहाटेपासून पावसाचा जोर प्रचंड वाढला. मुंबई, उपनगर आणि नवी मुंबईत जोरदार पावसामुळे सकाळीच काही भागांत पाणी साचले असून वाहतूक व्यवस्थेवर त्याचा परिणाम झाल्याचे दिसून आले.

दुसरीकडे, विदर्भात वादळी वाऱ्यांसह पावसाचा इशारा देण्यात आला असून, काही भागांमध्ये वाऱ्याचा वेग ताशी ५० ते ६० किमीपर्यंत जाण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. नागपूर, अकोला, चंद्रपूर, गडचिरोली आणि यवतमाळसारख्या जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह मेघगर्जनेसह सरी पडण्याची शक्यता आहे. काही भागांत आकाश ढगाळ राहण्याची चिन्हं आहेत.



मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडा विभागांत सध्या फारसा पाऊस नाही. काही ठिकाणी ऊन-पावसाचा लपंडाव दिसून येतो आहे. यामुळे शेतीसाठी आवश्यक असलेल्या पावसाची प्रतीक्षा अजूनही कायम आहे.

हवामान तज्ज्ञ के. एस. होसाळीकर यांच्या म्हणण्यानुसार, मान्सूनची दाबरेषा अद्याप स्पष्टपणे तयार झालेली नसल्यामुळे ही स्थिती मान्सून खंड नाही, परंतु मान्सूनची गती निश्चितच मंदावली आहे. त्यांनी १२ ते १४ जूननंतर पावसात वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली असून, शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असा सल्लाही दिला आहे.

दरम्यान, मुंबई, पुणे, नाशिक आणि औरंगाबादमध्ये तापमान ३२ ते ३४ अंश सेल्सिअस दरम्यान असून, आर्द्रता ७० ते ९० टक्क्यांच्या दरम्यान आहे. परिणामी उकाड्याची तीव्रता अधिक जाणवत आहे आणि नागरिकांना येत्या काही दिवसांतही अशाच वातावरणाचा सामना करावा लागणार असल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे.

# भरधाव कारच्या धडकेत दुचाकीवरील नवरा-बायको जागीच ठार

### बीडच्या बायपास वरील दुर्दैवी घटना; सर्वत्र हळहळ व्यक्त



गेवराई । प्रतिनिधी

बीडच्या बायपास रोडवर बुधवार दि.०४ मे रोजी सायंकाळी सुमारे पाच वाजण्याच्या सुमारास एक भीषण अपघात झाला. भरधाव वेगात असलेल्या फोर व्हीलर कारने दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने मोटारसायकलवरील नवरा-बायको जागीच ठार झाल्याची घटना बीड बायपासवर घडली असून या अपघातात मृत्यू झालेल्यांची नावे बळीराम पांडू राठोड (वय ४०) व सुमनबाई बळीराम राठोड (वय ३८) अशी आहेत. दोघेही राजपिंपरी (ता. गेवराई, जि. बीड) येथील रहिवासी होते.

मिळालेल्या माहितीनुसार, बळीराम राठोड आणि त्यांची पत्नी सुमनबाई हे अंतर्वन पिंपरी तांडा येथे एका लग्नासाठी गेले होते. लग्नाची समारंभआटोपून ते मोटारसायकलवरून परत येत असताना बीड बायपास रोडवर भरधाव वेगात असलेल्या एका फोर व्हीलर कारने त्यांना पाठीमागून धडक दिली. धडक इतकी जोरदार होती की, दोघांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली व संबंधित पोलिसांना कळवले. अपघाताची नोंद घेण्यात आली असून, मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी बीडच्या जिल्हा रुग्णालयात दाखल येथे पाठवण्यात आला होता. पुढील तपास पोलीस करत आहेत.

# पाटोदा तालुका बनला भुरट्या चोरांचा अड्डा!

### दररोज एक चोरी पोलीस प्रशासन केवळ हतबल

पाटोदा । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुका सध्या भुरट्या चोरट्यांच्या विळख्यात अडकला असून, दररोज होणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे जनतेमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. लोकांची झोप उडाली असून, चोरट्यांच्या धाडसी कारवायांमुळे पाटोदा 'चोरांचा अड्डा' बनतो की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून शहरासह तालुक्यातील विविध गावांमध्ये भुरट्या चोऱ्यांचं सत्र सुरू आहे.

मोबाईल, दुचाकी, दुकानातील रोकड, शेती साहित्य चोरी यामध्ये झपाट्याने वाढ होत असून, आश्चर्य म्हणजे पोलिसांच्या हाती अजूनपर्यंत एकाही चोरट्याचा ठोस सुगावा लागलेला नाही! जनतेचा संताप उसळला! रोज सकाळी कुठे तरी चोरीची घटना झाली असते. पोलिसांचं काम फक्त एफआयआर लिहिणं आणि 'तपास सुरू आहे' सांगणं इतकंच उरलंय का? असा थेट सवाल पाटोदा शहरातील नागरिकांनी केला आहे. तालुक्यातील दिवसाढवळ्या सुरू असलेल्या चोऱ्यांवर कुठलाही राजकीय नेता उघडपणे बोलताना दिसत नाही. जनतेच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला असतानाही नेत्यांचं मौन अनेक प्रश्न निर्माण करत आहे.

**नागरिकांची एकमुखी मागणी**

गावोगावी सीसीटीव्ही अनिवार्य करा चोरट्यांच्या मुसक्या आवळण्यासाठी पाटोदा तालुक्यातील पोलीस यंत्रणा सक्रिय करा अशी मागणी सर्वसामान्य जनतेतून होत आहे.

पान १ वरून...

## साईराम अर्बन ची ५३ कोटींची संपत्ती सिल...

सोशल मीडियातून दिसणारे परभणेही शेवटी फरार झाले होते. ९ महिन्यांपूर्वी शाहीनाथ परभणे, विनायक परभणे आणि कुणाल परभणे यांना आर्थिक गुन्हे शाखेने पुण्यातून अटक केली होती. ठेवीदार हित संरक्षण कायद्यानुसार गुन्हा नोंद झाल्यामुळे अध्यक्ष, संचालक यांची मालमत्ता शोधून त्याच्या विक्रीसाठी व जप्तीसाठी आर्थिक गुन्हे शाखेकडून प्रयत्न सुरू होते. एमपीआयडीचा प्रस्ताव पाठवण्यासाठी ठेवीदारही पाठपुरावा करत होते. अखेर आर्थिक गुन्हे शाखेने ५३ कोटींच्या मालमत्ता शोधून काढल्या असून त्यांचा प्रस्ताव पाठवला आहे. पतसंस्थेच्या मालमत्तेचा लिलाव झाल्यास ठेविदारांना लवकर ठेवी मिळू शकतील, त्यामुळे जिल्ह्यातील ठेविदारांच्या आशा अपेक्षा आता वाढल्या आहेत.

## ट्रॅक्टर चोरी करणाऱ्या टोळीतील आरोपीस स्थागुशाने केले जेरबंद

उघडकीस न आलेल्या गुन्हयांचे विश्लेषण अभिलेखावरील गुन्हेगारांची माहिती काढत असतांना दिनांक ०३/०६/२०२५ रोजी गुप्त बातमीदार मार्फत माहिती मिळाली की, सदरचा गुन्हया हा १) दिपक महादेव चाटे वय १९ वर्षे रा.तांबवा ता.केज.जि.बीड २) अमोल सुधाकर घायतीडक वय २१ दोन्ही रा.चिंचवण ता.वडवणी जि.बीड ३) समाधान कोंडीराम मुंढे वय २० ४) सचीन सतीष मुंढे वय - १९ वर्षे दोन्ही रा. चोंडी ता. धारुर जि.बीड यांनी मिळुन चोरला आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळाले वरुन आम्ही लागलीच टिम सह सदर आरोपीतांचे शोध कामी तांबवा येथे जावुन यातील आरोपी नामे दिपक महादेव चाटे याचा शोध घेवुन त्यास ताब्यात घेवुन त्यास गुन्हया बाबत विचारपुस केली असता त्यांनी सदरचा गुन्हा केला असल्याची कबुली देवुन सदर गुन्हा उघडकिस आणला आहे. त्याचे ताब्यातुन चोरीकेलेला ट्रॅक्टर नांगरासह कि.४,३५,०००/- किंमतीचा जप्त करुन ताब्यात घेवुन पोलीस ठाणे वडवणी यांचे ताब्यात दिला आहे. सदर आरोपीस दिनांक ०५ /०६/ २०२५ पर्यंतची पोलीस कोठडी सुणावण्यात आली आहे.

सदर गुन्हयात एकुण चार आरोपी आरोपी निष्पन्न झालेले असुन त्यापैकी एका आरोपींस स्था.गु.शा. पथकाने पुढील कार्यवाहीसाठी पो.स्टे. वडवणी यांचे ताब्यात दिलेले असुन गुन्हयातील उर्वरीत आरोपीचा शोध शोध पो.स्टे.वडवणी व स्थागुशा बीड करीत आहे.

सदरची कामगिरी ही मा. नवनीत कॉवत पोलीस अधीक्षक बीड, मा.अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.शिवाजी बंटेवाड, पोउपनि महेश विघ्ने, पोह/महेश जोगदंड, पोह/राजु पठाण, पोअं/बप्पासाहेब घोडके, पोअं/अश्विनकुमार सुरवसे नेम.स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांनी केलेली आहे.

## खरात आडगाव जलजीवनचे काम निकृष्ट

योजनेअंतर्गत गावाचा समावेश करून गावाला शुद्ध पाणी मिळावे म्हणून प्रयत्न केले मात्र जल जीवन योजनेचे इंजिनीयर आणि गुत्तेदार यांनी यामधूनही फक्त पैसे कमवीण्याचा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून काम केले निकृष्ट दर्जाचे पाईप वापरल्याने गावकऱ्यांना पाणी मिळणे अगोदरच पाईपलाईन शंभर जागेवर फुटली यामुळे खरात आडगाव येथील जनता पाण्यापासून वंचित राहिले जल जीवन योजना म्हणजे गुत्तेदार पोचण्याची योजना आहे का? असा प्रश्न गावकरी व्यक्त करत आहेत.

सदर गुटेदाराने आणि इंजिनीयरने निकृष्ट दर्जाची जलजीवन योजना राबवली यामध्ये पाणी साठवण्यासाठी पाण्याच्या उंच टाकीचे प्रयोजन असते टाकी तर उभा राहिलीच नाही मग पाणी साठवणार कुठे? जिल्हा परिषदेचे अधिकारी आणि कर्मचारी यांचे काय साठे लोटे तर नाही ना असा प्रश्न खरात आडगाव येथील जनतेला पडला असेल सदर गुत्तेदार आणि इंजिनियर यांचे बिलीन काढू नका अन्यथा खरात आडगाव येथील समस्त गावकरी बहुसंख्येने उपस्थित राहून जिल्हाधिकारी कार्यालय यांच्यासमोर आंदोलन करतील, असा इशारा गावकऱ्यांनी बोलताना व्यक्त केला आहे.

# साक्षगंधातच आदित्य व कीर्ती यांचा मंगल परिणय संपन्न

## पप्पू कागदे यांच्यासह मान्यवरांच्या पुढाकाराने जोगदंड–गायकवाड परिवाराचा अभिनंदनीय निर्णय

बीड । प्रतिनिधी

अनिष्ट, रूढी परंपरांना फाटा देऊन अनावश्यक खर्चाला बगल देऊन नागोबा गल्ली पेठ बीड येथील रिपाइंचे जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड यांनी आपला मुलगा आदित्य यांचा देविदास गायकवाड यांची कन्या कीर्ती यांचा साक्षागंधातच मंगळवार (दि. ३) जून रोजी नागोबा गल्ली येथील सम्यक सम्बुध्द विहारात पूज्य भिक्खू धम्मशील थेरो यांनी विधिवत मंगल परिणय संपन्न केला. नागोबा गल्ली पेठ बीड येथील सम्यक सम्बुध्द विहारात आदित्य व कीर्ती यांचा साक्षागंधाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी मान्यवरांच्या उपस्थितीत पुढाकार घेऊन जोगदंड–गायकवाड परिवारांशी चर्चा करून साक्षागंधातच आदित्य व कीर्ती यांचा मंगल परिणय संपन्न केला.



अनावश्यक खर्चाला व रुढी, परंपराला मूठमाती देऊन साक्षागंधातच आपल्या मुलाचा मंगल परिणय संपन्न करून जोगदंड व गायकवाड परिवाराने आदर्श निर्माण केला. साक्षागंधातच मंगल परिणय करण्याच्या परंपरेला खंड पडला होता. ही परंपरा पुढे चालू ठेवण्यासाठी जोगदंड व गायकवाड परिवाराने एकमुखी निर्णय घेऊन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत आपल्या मुलांचा साक्षागंधातच मंगल परिणय करून वेळेची व अनावश्यक खर्चाची बचत केली. मंगल परिणयात युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, माजी आ. राजेंद्र जगताप, माजी आ. जनार्दन तुपे, अशोक हिंगे, डॉ. सतीश साळुंखे यांनी राजू जोगदंड यांनी घेतलेल्या निर्णयाचे कौतुक करून त्यांचे स्वागत केले.

सामाजिक जाण व भान असणाऱ्या जोगदंड व गायकवाड परिवाराच्या मंगल परिणयास बबन वडमारे, विष्णू वाघमारे, किसन तांगडे, अशोक वाघमारे, अजय सवाई, गणेश वाघमारे, अरुण भोले, महेंद्र कांबळे, ॲड. सुरेश वडमारे, शितलकुमार सुकाळे, प्रशांत वासनिक, नाना मस्के, अरुणराव कागदे, मिराताई कागदे, मायाताई मिसळे, अरुणाताई आठवले, संगीता वाघमारे, चंद्रकांत जोगदंड, गौतम चोपडे, गौतम मस्के, दामूशेठ मानधने, बाजीराव इंगोले, यश खेमाडे, अविनाश जोगदंड, नागेश दुबळे, विलास जोगदंड, सुभाष तांगडे, प्रभाकर चांदणे, अक्षय कोकाटे, भारत कांबळे, ॲड सुशील वडमारे, ॲड.राहुल साळवे, ॲड. देवदत्त शिंदे, संतोष गायकवाड, आप्पा मिसळे, पप्पू वाघमारे, समाधान जाधव, उमेश कांबळे, कपिल सौदा, गौतम कांबळे, रफिकभाई फिटर, सय्यद शफयोदिन, अन्सार खान, रफिकभाई मिस्त्री, ॲड.राजेश जोगदंड, सूर्यकांत जोगदंड, सनी जोगदंड, सुमित जोगदंड, जमन जोगदंड यांच्यासह सामाजिक राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

### सामाजिक निर्णय आणि कार्यात अग्रेसर

ररिपाइंचे जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड यांचा परिवार फुले–शाहू–आंबेडकरी चळवळी बरोबरच धम्माची चळवळ गतिमान करण्यासाठी अग्रेसर राहून काम करतात. नेहमीच परिवर्तनीय उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे काम करणाऱ्या राजू जोगदंड यांनी समाजातील अन्यायाच्या विरोधात जाऊन जिल्हा नियोजन समिती सदस्य पदाचा राजीनामा दिला होता.

# संध्या सोळंके यांच्या पुस्तकाची पुरक वाचनासाठी निवड



अंबाजोगाई । प्रतिनिधी

संध्या शिंदे (सोळंके) यांनी इयत्ता सहावी ते आठवीच्या स्तरासाठी लिहिलेले मधली सुट्टी हे पुस्तक राज्यस्तरावर निवडले गेले होते तेच पुस्तक आता पुरक वाचनासाठी निवडले आहे. सदरील पुस्तक आता राज्यभरातील सर्व जिल्हा परिषद शाळांच्या ग्रंथालयात वितरित झाले आहे.

संध्या सोळंके ह्या सिद्धहस्त लेखिका म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांची माऊली कथा सर्वश्रुत आहे. संध्या सोळंके यांचे पुस्तक नुकतेच शाळकरी मुलां साठी आले आहे. या पुस्तकात संध्या सोळंके यांनी त्या पुस्तकात बाल पणाच्या काळाचे वर्णन केले आहे. हजारो पुस्तकातून त्यांच्या पुस्तकाची निवड झाली आहे. समग्र शिक्षा अंतर्गत पुरक वाचनासाठी संध्या सोळंके यांचे हे पहिले पुस्तक आहे. त्याचे राज्यभर वितरण झाले आहे. मुलं ते पुस्तक वाचून नक्कीच समृद्ध होतील असा विश्वास संध्या सोळंके यांनी व्यक्त केला आहे. त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# वन विभागाच्या वतीने सर्पराझीत जागतिक पर्यावरण दिन साजरा

शिरूर कासार । प्रतिनिधी

वन विभाग बीड वनपरिक्षेत्र अधिकारी पाटोदा (प्रा) यांच्या वतीने सर्पराझी वन्यजीव पुनर्वसन केंद्र तागडगाव ता.शिरूर जि.बीड येथे आज दिनांक ५ जून जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण करून पर्यावरण दिन साजरा करण्यात आला.



५ जून जागतिक पर्यावरण दिन या दिनाचे औचित्य साधून वन विभाग बीड वनपरिक्षेत्र अधिकारी पाटोदा (प्रा) यांच्या वतीने विभागीय वन अधिकारी अमोल गरकळ व वनपरिक्षेत्र अधिकारी श्रीकांत काळे यांच्या नेतृत्वाखाली सर्पराझी वन्यजीव पुनर्वसन केंद्र तागडगाव येथे सर्पराझीचे संचालक वन्यजीवांचे पिता सिद्धार्थ सोनवणे, वनपालअजय देवगडे व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वड, पिंपळ, पिपरी, चिंच, जांभूळ, आदी वृक्षांचे रोपण करून जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमास वन्यजीवांचे माता – पिता सृष्टी सोनवणे, सिद्धार्थ सोनवणे, वनपाल अजय देवगुडे, वनरक्षक नवनाथ काकडे, गणेश सानप, संदीप राठोड, दादासाहेब यदमल, संगीता पवार, वन कर्मचारी रामेश्वर बेंद्रे, अंबादास लवांडे, सत्तर शेख, आप्पासाहेब सातपुते, सोपान येवले, सतीश गरजे, गहिनीनाथ दानवले, भीमराव सव्वाशे आदी उपस्थित होते.

# डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया यांचे प्रशिक्षण शिबिराचे आयोजन : सुभाष लोणके

बीड । प्रतिनिधी

परिवर्तनवादी स्मृतीशेष आत्मारामजी चांदणे यांच्या जयंतीनिमित्त डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया बीड जिल्ह्याच्या वतीने येत्या ९ जून रोजी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे

बीड जिल्हा हा पुरोगामी विचारांचा जिल्हा आहे येथे अनेक विचारवंत सामाजिक कार्यकर्ते चळवळीला नवी दिशा देणारे व्यक्तिमत्व बीडच्या माती त जन्माला आले यातच दलित व आंबेडकरी चळवळीला एक नवी दिशा देणारे व्यक्तिमत्व बीड जिल्ह्याच्या माती जन्माला आले स्मर्तिशेष आत्मारामजी चांदणे आंबेडकरी विचाराला व दलित वंचित शोषित वर्गाला एक नवी दिशा देणाऱ्या व्यक्तिमत्व आंबेडकरी चळवळ महाराष्ट्र भर उभा करणारे एक कणखर व्यक्तिमत्व व अभ्यास दलित नेतृत्व आत्माराम चांदणे यांनी आपलं आयुष्य दलित पीडित वंचित सुचित समाजाच्या न्याय हक्कासाठी उन्नतीसाठी व त्यांच्या प्रगतीसाठी समर्पित केले जिल्ह्यातील सर्व जाती धर्माच्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन आंबेडकरी चळवळीची एक नवी फळी उभा केली वंचित शोषित लोकांच्या न्याय हक्कासाठी आपलं संपूर्ण आयुष्य ते सतत राहिली आयुष्यभर आंबेडकरी चळवळीचा लढा लढत राहिले इथल्या न्यायव्यवस्थे व समाज व्यवस्थेच्या विरुद्ध आंबेडकरी विचारांची शिदोरी सोबत घेऊन समाज व्यवस्थेने नाकारलेल्या समाजासाठी व त्यांना स्वाभिमानाने जगण्यासाठी आत्मारामजी चांदणे यांनी लढा दिला त्यांची चळवळ त्यांचे विचार आजही प्रेरणादायी आहेत त्यांच्या या कार्याला व त्यांच्या लढ्याला एक उजाळा म्हणून येत्या नऊ जून रोजी डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया बीड जिल्ह्याच्या वतीने कार्यकर्ता शिबिर आयोजन केले आहे या शिबिराला पक्षाचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक सुकुमार जी कांबळे पक्षाचे राज्य अध्यक्ष श्री अजिंक्य भैय्या चांदणे व पक्षाचे ज्येष्ठ नेते अशोक बाप्पा सोनवणे हे आवर्जून उपस्थित राहणार आहेत आयोजक व डी पी आय चे जिल्हाध्यक्ष सुभाष लोणके यांनी या शिबिराचे आयोजन केले आहे.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सा. युवती राज पेपरचे अवलोकन करून शुभेच्छा

मुंबई । प्रतिनिधी

मुंबई मंत्रालयात लोकशाही पत्रकार संघ संलग्न महिला अन्याय अत्याचार निर्मूलन समितीच्या प्रदेश अध्यक्ष हलिमाताई शेख यांनी उपमुख्यमंत्री मा. अजीत दादा पवार यांची भेट घेऊन लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्याचा वतीने लोकरत्न पुरस्कार कार्यक्रम साठी वेळ देण्याची देखील विनंती केली. त्याच बरोबरउपमुख्यमंत्री अजीत दादा पवार, मंत्री अदिती तटकरे,आ. मा.नरहरी शिरवळ सा. युवती राज चे अवलोकन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.



सा. युवती राज वृत्तपत्राच्या माध्यमातून गोरगरीब यांचे प्रश्न सिदविण्यासाठी विशेष बातम्या करणार आहे. पुणे शहरातील अवैध धंदे, भ्रष्टाचार बाहेर काढणार आहे. सर्व शासकीय अधिकारी यांनी प्रामाणिक कार्य करावे. आम्ही आपल्या सदैव पाठीशी राहू. पण जर कुठे चुकीचं कामे झाली तर खैर नाही. सर्वांनी मिळून विकासात्मक कामे करू. जास्तीत जास्त लोकांपर्यंत सा. युवती राज वृतपत्र दिसेल. याची मला खात्री आहे. आम्ही कुणाच्याही दबावाखाली बातमी करणार नाही. योग्य ती बातमी देणार आहोत. त्यामुळं लवकरच सर्वांचे आवडते वृत्तपत्र होईल. असे मला वाटते काही पत्रकारांनी आपली विश्वास गमावला की काय असे प्रश्न निर्माण होताना दिसते आहे.

सडेतोड बातमी आम्ही छापणार हे सर्व आमच्या वाचायकांना दिसेल. ज्या नगरिकांचे कामे होतं नसतील त्यांनी आम्ही सुरु केलेल्या पत्रकार प्रश्न कट्टा मध्ये मांडावेत. आम्ही ते शासन दरबारीं मांडू. सर्व ठिकाणी कामात सावळा गोन्धळ चालू आहे. तो थांबला पाहिजे. यासाठी आमची पत्रकारिता असेल. लवकरच लोकशाही पत्रकार संघाच्या व तीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना लोकरत्न पुरस्कार प्रोग्राम घेणार आहोत.

# पालीच्या चांदतारा मस्जिद जवळील विजेचे पोल ठरतील मृत्यूचे सापळे !

## पावसाळ्यापूर्वीच एमएसईबीने गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे

पाली । प्रतिनिधी

येथील चांद तारा मज्जिदच्या पाठीमागे असलेल्या मोहल्यात विजेचे खांब वाकडे तिकडे झाले आहेत. विद्युत प्रवाह वाहत असलेल्या तारा खाली लोमकाळू लागल्या आहेत. याची दखल एम एस सी बी ने तात्काळ घेतली नाही तर या ठिकाणी दुर्दैवी घटना होऊ शकतात. पावसाळ्यापूर्वीच जर सदरील विजेचे पोल, लोंबकळत असलेल्या तारा दुरुस्त केल्या नाहीत तर रस्त्यावर उतरून एमएसईबीच्या विरोधात आंदोलन करण्याचा इशारा या भागातील ग्रामस्थांनी दिला आहे.



बीड पासून जवळ असलेल्या आणि तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत असलेल्या पाली येथील एम एस सी बीच्या वीज पोलची अवस्था अतिशय दयनीय आणि बिकट झाली आहे. चांदतारा मज्जिदच्या पाठीमागे असलेल्या मोहल्यांमध्ये तर विजेचा लपंडाव कायम असतो.यामुळे या भागातील नागरिक वैतागलेले आहेत. त्यातच पोल वरील तारा खाली लोंबकळत आहेत. या तारेमधून वीज प्रवाह वाहत असल्यामुळे कोणतीही दुर्दैवी घटना घडू शकते. पाऊस जास्त झाला तर विजेचे जीर्ण झालेले काम खांब आडवे होऊ शकतात. जर असे झाले आणि विद्युत प्रवाह सुरू असलेल्या तारा जर घरावर, दुकानावर पडल्या तर मोठी दुर्दैवी घटना घडू शकते. त्यामुळे वीज कंपनीने याची तात्काळ दखल घेऊन या भागातील जीव घेण्या वीज पोल वरील तारांची दुरुस्ती तात्काळ करावी अन्यथा या भागातील ग्रामस्थ एम एस ई बी च्या विरोधात रस्त्यावर उतरून आंदोलन करतील असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# श्री पार्डीकर महाविद्यालयात वृक्ष लागवड करून पर्यावरण दिन साजरा



सिरसाळा । प्रतिनिधी

सिरसाळा दि.५ जून २०२५ वार गुरुवार रोजी श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालयात पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के.के. पाटील तसेच माजी प्राचार्य डॉ. एच.पी. कदम हे उपस्थित होते.

याप्रसंगी महाविद्यालयामध्ये वृक्ष लागवड करण्यात आली. माजी विद्यार्थी अतुल कराड यांची जिल्हा परिषद शिक्षक पदी निवड झाल्याबद्दल महाविद्यालयातर्फे व माजी विद्यार्थी संघामार्फत पुष्पहार व पुस्तक देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी अतुल कराड, बालाजी देशमाने, बाळासाहेब शिंदे तसेच विलास बनसोडे सर यांच्या हस्ते वृक्ष लागवड करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा दयानंद झिंजुर्डे प्रा डॉ ज्ञानेश्वर मस्के व विद्यार्थी उपस्थित होते.

# राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीच्या प्रदेश सचिवपदी अर्शद बागवान

मुंबई । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. अजितदादा पवार यांच्या आदेशाने व पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मा. खा. श्री. सुनील तटकरे यांच्या मान्यतेने राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या प्रदेश सचिवपदी मा. श्री. अर्शद रज्जाक बागवान यांची नियुक्ती करण्यात आली. राष्ट्रवादी युवक संघटना वाढीसाठी व सर्व ध्येय धोरणे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी आपण कायम सजग आणि तत्पर असाल याची पक्षाला खात्री आहे.

यावेळी, प्रदेश सरचिटणीस मा. आ. श्री. शिवाजीराव गर्जे, मुख्य प्रवक्ते मा. श्री. आनंद परांजपे, युवक प्रदेशाध्यक्ष मा. श्री. सुरज चव्हाण, माजी आमदार मा. श्री. अरविंद चव्हाण, अल्पसंख्यांक प्रदेश सरचिटणीस मा. श्री. कय्युम खान यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेसची विचारसरणी, ध्येय– धोरणे ग्रामीण भागातल्या शेवटच्या माणसापर्यंत पोहचविण्याबरोबरच, युवकांचे विधायक विचारांचे संघटन उभारुन पक्ष मजबुत करण्यासाठी प्रयत्नशिल राहणार असल्याचे त्यांनी नियुक्ती दरमयान नवनिर्वाचीत प्रदेश सचिव अर्शद रज्जाक बागवान ययांनी बोलतांना व्यक्त केले. गेल्या काही वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी विस्तारासाठी दिलेले योगदान, तसेच युवकांचे संघटन पाहता ही जबाबदारी देवून त्यांचा पक्षाने सन्मान केला आहे. राज्यात युवकांचे संघटन अधिक मजबुत करण्यासाठी आपण येत्या काळात अथक परिश्रम घेवून ही जबाबदारी यशस्वी रित्या पार पाडण्याचा विश्वास त्यांनी यावेळी दिला.

# संभाजीनगरच्या दरोड्यात बीड कनेक्शन; अंबाजोगाईसह नांदेडला पथक रवाना

बीड । प्रतिनिधी

शहरातील उद्योजक संतोष लड्डा यांच्या घरावर पडलेल्या दरोड्याप्रकरणी एक महत्त्वाची अपडेट पुढे आलेली आहे. लड्डा यांनी चोरीला गेलेल्या सोन्याच्या दागिन्यांच्या पावत्या पोलिसांकडे सुपूर्द केल्या असून, आता पोलीस त्यांची पडताळणी करणार आहेत. याशिवाय, दरोडेखोरांनी चोरलेले सोने नेमके कुठे ठेवले आहे, याचा तपास लागल्याचा दावा पोलिसांकडून करण्यात येत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणात एन्काउंटरमध्ये मारला गेलेला आरोपी अमोल खोतकर याने नांदेड येथील एका व्यक्तीला चोरीचे सोने दिल्याचे तपासात समोर आले आहे. या माहितीच्या आधारे, चोरीला गेलेल्या सोन्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांची दोन पथके नांदेड आणि बीडच्या अंबाजोगाई येथे रवाना झाली आहेत. पोलिसांनी अटक केलेल्या अंबाजोगाई येथील एका दरोडेखोरालाही या पथकांसोबत नेले आहे, जेणेकरून सोन्याचा शोध घेण्यास मदत होईल.

बजाजनगरमधील उद्योजक संतोष लड्डा यांच्या घरात पडलेल्या दरोड्यात तब्बल साडेपाच किलो सोने, ३२ किलो चांदी आणि ७० हजार रुपये रोख असा मोठा ऐवज दरोडेखोरांनी चोरून नेला होता. यापैकी आतापर्यंत पोलिसांना केवळ ३२ तोळे सोने आणि ८ लाख रुपये हस्तगत करण्यात यश आले आहे. उर्वरित सोन्याच्या शोधासाठी पोलीस कसून तपास करत आहेत.

दरोडा पडल्यानंतर तब्बल १९ दिवसांनी, मंगळवारी उद्योजक लड्डा यांनी तपास अधिकारी पोलीस निरीक्षक पवार यांची भेट घेतली आणि त्यांना चोरीला गेलेल्या सोन्या–चांदीच्या दागिन्यांच्या पावत्या सादर केल्या. गेली काही दिवस संतोष लड्डा हे चोरीला गेलेल्या सोन्याच्या पावत्या का देत नाहीत, यावर शहरात चर्चा सुरू झाली होती. आता पावत्या सादर केल्याने पोलिसांना तपासात अधिक मदत होईल अशी अपेक्षा आहे. या प्रकरणातील पुढील घडामोडींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# कायदेशीर मान्यता असलेल्या कौशल्यावर आधारित रमी नावाच्या खेळाला क्लबची उपमा देऊन संस्थेला बदनाम करण्याचा काही लोकांचा कुटील डाव : पटाईत

वडवणी । प्रतिनिधी

त्रिमूर्ती सांस्कृतिक कला व क्रीडा मंडळ या.माजलगाव जि.बीड या संस्थेची एक शाखा तलवाडा याठिकाणी सुरू करण्यात आली असून यामध्ये कॅरम, बुद्धीबळ, रमी आदी खेळ खेळले जातात. यामध्ये कुठेही पैशाचा वापर केला जात नाही. पत्त्याचा रमी नावाचा खेळ कॉईन (टोकन) देऊन खेळला जातो. या खेळाला मा.हायकोर्ट औरंगाबाद – मुंबई – नागपूर तसेच मा.सुप्रीम कोर्टाने देखील रिट पिटिशन नुसार कायदेशीररीत्या मान्य केलेले आहे. परंतु काही लोकांनी खोडसाळ पणाने रमी नावाच्या खेळाला क्लबची उपमा देऊन संस्थेला बदनाम करण्याचा कुटील डाव रचून वर्तमान पत्रात बातमी प्रकाशित केली असून यामुळे विनाकारण गैरसमज होऊन संस्थेची बदनामी झाली असे मत त्रिमूर्ती सांस्कृतिक कला व क्रीडा मंडळाचे अध्यक्ष – ईश्वर पटाईत यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून व्यक्त केले आहे.

बीड जिल्ह्यात अनेक ठिकाणी वर नमूद केल्याप्रमाणे कौशल्यावर आधारित खेळ खेळले जात असून या खेळाला कायदेशीर मान्यता आहे. सध्या तलवाडा याठिकाणी अशाप्रकारचे खेळ दोन ठिकाणी सुरू असून एका ठिकाणी नुकतीच एक शाखा सुरू करण्यात आली आहे. परंतु काही लोकांनी जाणीवपूर्वक काही वर्तमान पत्रात बातमी प्रकाशित करून गैरसमज निर्माण केला आहे. यामध्ये तलवाडा येथे नुकतेच रूजू झालेले सपोनि मनोज निलंगेकर यांच्या नावाचा देखील विनाकारण उल्लेख केला आहे. सदरील ठिकाणी कुठेही पैशाचा वापर केला जात नसून वरील संस्था हि नोंदणीकृत आहे असेही संस्थेचे अध्यक्ष – ईश्वर पटाईत यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे. त्रिमूर्ती सांस्कृतिक कला व क्रीडा मंडळ यांचे शाखा क्रिडा केंद्र नोंदणी क्रमांक बीड ००००००८४/२०२४ व एफ नोंदणी क्रमांक एफ – ००२७९५९ (बीड) व मा.ना. हायकोर्ट छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) रिट पिटिशन नं.१२९९/२४ अशी असून सदर संस्थेची शाखा तलवाडा येथे दि.०२ जून रोजी सुरू करण्यात आली आहे असेही पटाईत यांनी सांगितले आहे.

सदरील शाखा क्रिडा केंद्रामध्ये कायदेशीर व भारतीय ऑलिम्पिक मध्ये देशी, विदेशी बैठे आणि मैदानी खेळ खेळले जातात. उदा.कॅरम, बुद्धीबळ, रमी, गुणदान पध्दतीने ब्रीज कार्ड खेळणे इत्यादी खेळ खेळणे, स्पर्धा घेणे अशाप्रकारे समावेश आहे. तसेच यामध्ये कायद्याने बंदी घालण्यात आलेले कोणतेही खेळ खेळले जात नाहीत अथवा पैसे लावून कोणत्याही प्रकारचा जुगार खेळला जात नाही. सदर शाखा क्रिडा केंद्रामध्ये फक्त सभासदांना प्रवेश दिला जातो. तसेच सभासदाबरोबर दोन व्यक्तींना (पाहुणे) प्रवेश दिला जातो. त्याची त्यांना पावती दिली जाते. सभासदाशिवाय इतर कोणालाही खेळू दिले जात नाही. सदर क्रीडा केंद्रामध्ये संस्थेचे पदाधिकारी व कर्मचारी यांनाच प्रवेश दिला जातो. तसेच रमी व ब्रीज खेळासंदर्भात मा.सुप्रीम कोर्ट व मा.मुंबई हायकोर्टात दाखल करण्यात आलेल्या रिट पिटिशन नुसार कोर्टाने दिलेल्या सुचनांचे तंतोतंत पालन केले जाते.

केंद्रामध्ये मद्यपान व धूम्रपान करण्यास सक्त मनाई केली आहे. कोणत्याही प्रकारची फसवणूक होऊ नये यासाठी प्रत्येक ठिकाणी सीसी टिव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. इंटरनेट व वायफाय सुविधा उपलब्ध आहे. पोलिस अधिकारी केव्हाही तपासणी करू शकतात. अशा पध्दतीने हा खेळ सुरू असताना काही जणांनी विनाकारण वर्तमान पत्रात बातमी प्रकाशित करून व पोलिस अधिकारी यांचे नाव छापून बदनाम करण्याचा प्रयत्न केला आहे. यानंतर अशाप्रकारे विनाकारण संस्थेची अथवा कायदेशीररीत्या खेळल्या जाणाऱ्या खेळाची बदनामी करण्याचा प्रयत्न केला तर त्यास कायदेशीर उत्तर दिले जाईल असेही या संस्थेचे अध्यक्ष – ईश्वर पटाईत यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# बीड जिल्ह्यात १५० कोटी रुपयाच्या शासकीय इमारतीच्या कामाची ई-निविदा मॅनेज

## अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता यांचे कामाकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष चौकशी करण्याची मागणी

बीड । प्रतिनिधी

विनायक कन्स्ट्रक्शन आंबेजोगाई यांना बीडमधील प्रशासकीय इमारत जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय, सार्वजनिक बांधकाम कार्यालय, महसूल विभागाचे निवासस्थान, जिल्हा रुग्णालय इमारत यासह विविध कामे मिळवली आहेत. ही कामे मिळविताना अक्षरशः मोठी-मोठ्या अभियंत्यासोबत आर्थिक तडजोड करत ई-निविदा मॅनेज करत हजारो कोटीची कामे मिळवली आहेत. ई-निविदा प्रक्रिया मॅनेज केल्याचा आरोप वंचितचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी केला आहे.

माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये सर्व शासकीय कार्यालयाचे अंदाजपत्रक, प्रशासकीय मान्यता ई-निविदा प्रणालीची माहिती मागवली होती परंतु या ठिकाणी उपअभियंता तथा जन माहिती अधिकारी या पदावर काम करणारे बोराडे यांनी सदर माहिती देण्यासाठी स्पष्ट नकार दिला आहे. जेव्हा काम पूर्ण होईल तेव्हा तुम्हाला माहिली देऊ असंही कळविले आहे.

इमारतीचे कामकाज काम करत असताना कामाच्या आजूबाजूला कुंपण लावले आहे तसेच त्या ठिकाणी नूतन इमारतीचे बांधकाम कशा पद्धतीने चालू आहे हे पाहण्यास गेले असता त्या ठिकाणी ओळखीचे पोलीस कर्मचारी बोलविले जातात तसेच गार्ड यांना हाणामारी करण्याचे अधिकार दिले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियंता उपअभियंता लिपिक, लेखाधिकारी गेल्या अनेक वर्षापासून एकाच जागेवर काम करत असल्याने तडजोड घडवून आणतात त्यामुळे भ्रष्टाचाराला खत पाणी मिळत जाते.

सदर प्रकरणी अजय सरवदे यांनी मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे प्रत्येक कामाची चौकशी करत अधीक्षक अभियंता, गुण नियंत्रण मंडळ छत्रपती संभाजी नगर यांच्याकडून कामाची सखोल चौकशी करत कामाची गुणवत्ता तपासणी करावी अशी मागणी केली आहे.

### मा.मंत्री धनंजय मुंडे यांचा वरदहस्तामुळे ई-निविदा मॅनेज



विनायक कन्स्ट्रक्शनचे मनोज गित्ते यांच्यावर माजी मंत्री धनंजय मुंडे यांचा वरदस्त आहे त्यांच्यावर वरदहास्तामुळेच बीड शहरांमधील शासकीय कार्यालयाच्या नूतन इमारतीचे १५० कोटीचे कामे ई-निविदा मॅनेज करत मिळवली आहेत. या ठिकाणी मंत्री असताना दबावाचा वापर अधिकाऱ्यांवर केला असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी केला आहे सुरू असलेल्या प्रत्येक कामे मुदतीत पूर्ण होत आहेत का? गुणवत्ता तपासणी दबावात पूर्ण केली आहे का? याची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.

– **अजय सरवदे,** जिल्हाध्यक्ष,
वंचित बहुजन आघाडी बीड

# चैन स्नॅचींग करणाऱ्या तीन आरोपींना स्था.गु.शा.बीड ने केले जेरबंद



बीड । प्रतिनिधी

दिनांक २५/०५/२०२५ रोजी फिर्यादी नामे सुमन सुरेश सारुक रा.नंदनवन कॉलनी नगर रोड बालेपीर बीड यांनी पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथे फिर्याद दिली की, फिर्यादी हया त्यांच्या पती सोबत स्कुटी शिकण्यासाठी च-हाटा फाटा ग्राऊड येथे गेल्या होत्या परत घरी जातांना फिर्यादी स्कुटीवर एकटया जात असतांना फिर्यादी याचे पाठीमागुन अनोळखी तीन इसम हे विनानंबरच्या स्कुटीवर बसुन फिर्यादी यांचे जवळ आले व फिर्यादी यांचे गळयातील मिनी गंठन व सोन्याच्या मण्याचे मंगळसुत्र जबरदस्तीने हिसकाऊन च-हाटा फाटा बीड रोड कडे निघुन गेले. या मध्ये फिर्यादी यांचे सोन्याचे एकुण २२ ग्रॅम किंमती ८८,०००/– रुपयाचा मुद्देमाल जबरी चोरी करुन घेवुन गेले होते. यावरुन पोलीस स्टेशन शिवाजीनगर गुरंन २९४/२०२५ कलम ३०४,३(५) बी.एन.एस प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता.

मा.पोलीस अधीक्षक बीड यांनी उघडकीस न आलेल्या गुन्हयाचा आढावा घेवुन उघडकीस न आलेले जबरी चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड यांना आदेशीत केले होते. त्यावरुन पोलीस उप-निरीक्षक श्री. श्रीराम खटावकर यांनी अभिलेखावरील उघडकीस न आलेल्या गुन्हयांचे विश्लेषण अभिलेखावरील गुन्हेगारांची माहिती काढत असतांना दिनांक ०४/०६/२०२५ रोजी गुप्त बातमीदार मार्फत माहिती मिळाली की, सदरचा गुन्हया हा १) प्रकाश अशोक सानप वय १९ वर्षे २) सिध्दांत अशोक जाधव वय २१ दोन्ही रा.रायमोह ३) (विधीसंघर्षग्रस्त बालक) रा.खरगवाडी यांनी मिळुन केला आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळाले वरुन आम्ही लागलीच टिम सह सदर आरोपीतांचे शोध कामी रायमोह येथे जावुन आरोपीतांचा शोध घेवुन त्यांना ताब्यात घेवुन गुन्हया बाबत विचारपुस केली असता त्यांनी सदरचा गुन्हा केला असल्याची कबुली देवुन सदर चा उघडकिस आणला आहे.

सदर गुन्हयात एकुण तीन आरोपी आरोपी निष्पन्न झालेले असुन त्यापैकी एक (विधीसंघर्षग्रस्त बालक) आरोपींना स्था.गु.शा. पथकाने पुढील कार्यवाहीसाठी पो.स्टे.शिवाजीनगर यांचे ताब्यात दिलेले असुन गुन्हयातील गेलेमाल शोध पो.स्टे.शिवाजीनगर व स्थागुशा बीड करीत आहे.

सदरची कामगिरी ही मा. नवनीत कॉवत पोलीस अधीक्षक बीड, मा.अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.शिवाजी बंटेवाड, पोउपनि श्रीराम खटावकर, पोह/अशोक दुबाले, सोमनाथ गायकवाड, पोना/बाळु सानप, पोकॉ/अर्जुन यादव, अश्विनकुमार सुरवसे, चालक/सिध्देश्वर मांजरे, नेम. स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांनी केलेली आहे.

# अबब! धारूर शहरातील अनेक बोरवेल आतील मोटारीच गायब?

### मुख्याधिकारी साहेब जनतेला स्पष्टीकरण द्या

धारूर । प्रतिनिधी

धारूर नगरपरिषद अंतर्गत शहरात अनेक पाण्याच्या बोरवेल आहेत. नगरपरिषदेच्या वतीने नागरिकांची पाण्या वाचून गैरसोय होऊ नये म्हणून शहरात अनेक ठिकाणी विंधन विहीर बोरवेल घेण्यात आलेल्या आहेत.




या अनेक बोर वर नळाला पाणी न आल्यास शहरातल्या अनेक नागरिकांची तहान बोर भागवतात मात्र शहरात सध्या जल वहिनीच्या कामासाठी काम करताना अनेक जुने नळ कलेक्शन तुटलेले असून शहरातल्या नागरिकांना पाण्याचा अधिकचा सामना सोसावा लागत असल्याने नगरपरिषद ने घेतलेल्या विंधन विहीर वर पाणी भरून घ्यावा तर शहरातल्या दोन – चार बोअरवेल सोडल्या तर अनेक बोर बंद अवस्थेत अनेक वर्षांपासून आहेत त्यामुळे नागरिकांना पाणी विकत घेऊन आर्थिक फटका बसत आहे मात्र त्या बंद अवस्थेत असलेल्या बोर नीट न करता त्यात बोरवेलआतील मोटरी दुरुस्ती कामी नेल्या अन् कित्येक महिन्यापासून गायब झाल्या याची कोणालाही कल्पना नसल्याचे जनतेत चर्चा सुरू आहे. त्या घेऊन गेलेल्या दुरुस्तीसाठी मोटारी कुठायत अन् कोणाकड्येत ह्याची मा. मुख्याधिकारी साहेब यांना तरी माहितेय का? या सर्व प्रकाराची स्पष्टीकरण द्या अशी मागणी जनतेतून होत आहे.

जर त्या अनेक बोअरवेल आतील मोटारी दुरुस्ती केल्या तर शहरातल्या नागरिकांची गैरयोय होणार नाही पण या प्रकरणात मुख्याधिकारी यांच्या दुर्लक्षमुळे ही वेळ धारुकरांच्या वर आल्याने जनतेतून नगरपरिषद प्रशासनाचे कारभारावर नाराज असल्याच बोललं जात आहे तरी त्या बंद अवस्थेत असलेल्या बोरवेल आतील त्या मोटारी कुठे आहेत याच स्पष्टीकरण द्या व तत्काळ दुरुस्त करून प्रलंबित प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी शहरातील सर्वसामान्य नागरिकातून होत आहे.

# माजलगाव तेलगाव रस्त्याचे डांबरीकरण न केल्यास मंत्र्यासह सत्ताधारी आमदारांना फिरू देणार नाही : ॲड. नारायण गोले पाटील

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव शहरातून गेलेला राष्ट्रीय महामार्ग ५४८ सी माजलगाव तेलगाव रस्त्याचे तीन तेरा वाजले असून रस्त्याला प्रचंड भेगा पडल्या आहेत, दररोज रस्त्यावर अपघातात अनेक बळी जात आहेत, या रस्त्यावर आजपर्यंत शेकडो बळी गेलेले असुन शेकडो लोकांना कायमचे अपंगत्व आलेले आहे, तर शेकडो घरे सदरील रस्त्यावरील अपघाताने उध्वस्त झाले असून अनेक कुटुंबाचा आधार हरवलेला आह. अक्षरशः हा रस्ता मृत्यूचा सापळा बनला असून शासनाचे त्याकडे पूर्ण दुर्लक्ष असून लोकप्रतिनिधी सदरील रस्त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असून प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्या दुशासनास सामान्य जनता कंटाळलेली असून रस्त्यावरील अपघाताची मालिका थांबवण्यासाठी रस्त्याचे तात्काळ डांबरीकरण करण्यात यावे या मागणीसाठी भाई ॲड.नारायण गोले पाटील यांच्या



नेतृत्वाखाली आज सकाळी १०:००ते ११:३० वा. शेकापच्या वतीने तब्बल दिड तास रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शपा, समाजवादी पार्टी, मौलाना आझाद कलाम युवा मंच, राष्ट्रीय कॉंग्रेस, डी वाय एफ आय, संभाजी ब्रिगेड शिवसेना उबाठा यांच्यासह विविध पक्ष संघटना सह हजारो नागरिकांनी सहभाग नोंदवला. तब्बल तीन –तिन किलोमीटर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. या वेळी पोलीस प्रशासनाने तगडा बंदोबस्त लावला होता. यावेळी बोलताना शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड नारायण गोले पाटील यांनी शासनाला माजलगाव तेलगाव रस्त्यावर अजून किती बळी हवे आहेत..? असा संतप्त सवाल विचारत माजलगाव तेलगाव रस्त्याचे तात्काळ डांबरीकरण न झाल्यास सरकारातील मंत्र्यासह सत्ताधारी आमदारांना शेतकरी कामगार पक्ष माजलगाव मतदार संघात फिरू देणार नाही, असाही इशारा दिला.

या आंदोलनासाठी सलीम खान, नुमान भाई चाऊस, भाई मुंजा पांचाळ, भाई अशोक कुलकर्णी, नवीवोदिन सिद्दिकी, कॉंग्रेसचे हरिभाऊ सोळंके, राष्ट्रवादी कॉंग्रेस शपा चे विश्वांभर तावरे, सतीश बुरंगे, परमेश्वर डाके, तुकाराम नावडकर, नारायण तौर, सिद्धेश्वर काळे, विलास जावळे, सय्यद फारुख, अभिषेक सोळंके राहुल सोळंके नाजेर कुरेशी, भास्कर कांबळे, सचिन पांचाळ, हनुमान पांचाळ, अविनाश गोंडे, दत्ता कांबळे, जयराम राऊत, श्रीराम शेवाळे, श्रीकृष्ण कुरे, बालासाहेब फपाळ, बालासाहेब येवले, डॉ. मनसबदार, राहुल सोनगुडे आदींनी परिश्रम घेतले व शेवटी उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या वतीने तलाठी रूपचंद आभारे यांनी आंदोलकाचे निवेदन स्वीकारले.



सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक श्री मधुकर निर्मळ यांना अचानक हृदयविकाराचा झटका आला. यावेळी तातडीने त्यांना बीड शहरातील आधार हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. यावेळी आधार हॉस्पिटलचे मुख्य संचालक डॉ. सानप यांनी त्यांच्यावर उपचार करून त्यांना जीवनदान दिल्याबद्दल डॉ सानप यांचा निर्मळ परिवार आणि मित्रमंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला.


# सिरसाळा येथील ३४३ गटामध्ये मालकी हक्कासाठी पाठपुरावा करणार : शेख नय्युम

सिरसाळा । प्रतिनिधी



परळी तालुक्यातील सिरसाळा येथील सर्व अठरापगड जाती धर्मातील २५ ते ३० हजार लोक गेल्या चाळीस ते पन्नास वर्षाँ पासून गट नंबर ३४३ मध्ये वास्तव्यात राहत आहेत. त्याना ग्रामपंचायतुन कर भरुन पि टीआर व नळ कनेक्शन, विद्युत पुरवण्यासाठी नहरकत प्रमाणपत्र देण्यात येते. परंतु या सर्व १८ पगड जाती-धर्माच्या लोकांना मालकी हक्क मिळत नसल्याने सिरसाळा येथील आमदार धनंजय मुंडे यांचे कार्यकर्ते तरुण तडफदार व सिरसाळा ग्रामपंचायत सदस्य व समाजसेवक शेख नयुम यांनी गावातील लोकांना मालकी हक्क प्रवाहात आणण्यासाठी स्वतःहून शासन दरबारी पाठपुरावा करून सिरसाळा वासीयासाठी लक्ष देणार असल्याचे सांगितले आहे. अशी प्रतिक्रिया शेख यांनी दिली आहे.

सिरसाळा परिसरातील गोरगरीबांन च्या आडी अडचणीला धाऊन जाउन कामाला तात्पर तयार राहातात आता त्यानी अठरापगड जातील लोकांना हक्क ची पि टी आर मिळण्यासाठी स्वतः शासन दरबारी जाऊन पाठपुरावा करणार आहे.



# ऐतिहासिक कारंजा टॉवर चा असाही सन्मान : एस.एम.युसूफ

### मात्र गेंड्याची कातडी पांघरलेले बीड नगर परिषद अन् जिल्हा प्रशासन

बीड । प्रतिनिधी

शहरातील ऐतिहासिक कारंजा टॉवरच्या महत्त्वाविषयी जिथे एकीकडे सर्वसामान्य नागरिकांमध्ये जागरूकता आली आहे तिथे मात्र दुसरीकडे बीड नगर परिषदेसह जिल्हा प्रशासनाने गेंड्याची कातडी पांघरल्याचा अनुभव येत आहे. यामुळेच की काय या दोन्ही कार्यालयातील जबाबदार अधिकारी व कर्मचारी या ऐतिहासिक वास्तूकडे साधे ढुंकून पाहण्याची सुद्धा तसदी घेत नसल्याचे स्पष्ट दिसत आहे.

प्रशासकीय पातळीवर असे चित्र असले तरी मात्र दुसरीकडे सर्वसामान्य नागरिकांमध्ये या ऐतिहासिक कारंजा टॉवर च्या इमारती विषयी मोठ्या प्रमाणात जागरूकता आली आहे. याचा अनुभव नुकताच येथे आला. बीड शहरातील रहिवासी लक्ष्मणसिंह ठाकुर यांनी त्यांच्या वाढदिवसादिनी मित्रांकडून देण्यात येणाऱ्या शुभेच्छा स्वीकारण्यासाठी ऐतिहासिक कारंजा टॉवरला निवडले. तसेच हार-तुरे न स्वीकारता वायफळ खर्चाला फाटाही दिला. आलेल्या मित्रांकडून फक्त शालचा स्वीकार केला. त्यांच्या या निर्णयावर वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी आलेले त्यांचे मित्र गणेश तपासे, झुंजार धांडे, नितीन धांडे, सुरेश शेटे यांनी आनंद व्यक्त केला तसेच ऐतिहासिक कारंजा टॉवर चे परिपूर्ण नूतनीकरण करून या इमारतीची गरिमा अबाधित राखावी याकरिता संघर्षरत असलेले ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे यांनाही यावेळी येथे मानाने बोलविले. तेव्हा गंगाधरे यांनीही या विचारसरणीचे कौतुक करत म्हटले की, प्रत्येक बीड शहरवासीयाने ऐतिहासिक कारंजा टॉवर बद्दल असा चांगला सकारात्मक दृष्टिकोन ठेवला तर या ऐतिहासिक वास्तूचे परिपूर्ण नूतनीकरण लवकरात लवकर होण्यास हातभार लागेल. या वास्तूची गरिमा वाढेल असे म्हणून त्यांनीही ठाकूर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. अशी माहिती मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी प्रसिद्धी पत्रकातून दिली आहे.

# भारतीय सैन्याच्या सन्मानार्थ मा.आ.धोंडेंच्या नेतृत्वाखाली तिरंगा रॅली

### ऑपरेशन सिंदूर''च्या यशाबद्दल काढली तिरंगा रॅली

आष्टी । प्रतिनिधी

भारतीय सैनिकांनी जम्मू काश्मीरमधील पहलगाम हल्ल्यानंतर ऑपरेशन सिंदुर राबवत शत्रू राष्ट्र असलेल्या पाकिस्तानवर एअरस्ट्राइक करत प्रत्युत्तर देऊन अनेक दहशतवादी अड्डे उध्वस्त करून ऑपरेशन सिंदुर यशस्वी केल्याबद्दल आष्टी विधानसभा मतदारसंघाचे मा.आ.भिमरावजी धोंडे यांच्या वतीने भारतीय सैनिकांच्या समर्थनार्थ आष्टीत तिरंगा रॅली काढून सैनिकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. मा.आ.धोंडे यांच्या संपर्क कार्यालयापासून सकाळी ११ वाजता राष्ट्रगिताने रॅलीला सुरुवात झाली व शहरातील प्रमुख मार्गावरून तिरंगा रॅली काढण्यात आली. आष्टी शहरातून तब्बल १ ते २ किलोमीटर तिरंगा ध्वज हातात घेऊन निघालेल्या रॅली ने आष्टी शहर तिरंगामय झाले होते. भारत माता की जय या जयघोषाने आष्टी शहर दणाणले होते. दभक्तीपर गाणे व तिरंगामय वातावरणाने शहरात देशभक्ती ला उधाण आला होता.

आष्टी शहरातील मा.आ.भिमराव धोंडे यांच्या संपर्क कार्यालयापासून सुरू झालेली तिरंगा रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक, शनि चौक, कमान वेस, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौकात सभेने समारोप करण्यात आला. यावेळी भारत माता की जय, वंदे मातरम, हम सब भारतीय है, भारतीय सैन्यदलाचा विजय असो, वीर जवान तुझे सलाम अशा घोषणा देऊन आष्टी मतदारसंघातील सर्व हिंदू मुस्लिम देशप्रेमी नागरिक सैदव सैनिकांसोबत आहोत, हे दाखवून दिले. तिरंगा युवकांच्या हातात दिसून आला. 'भारतीय सैन्य जिंदाबाद', 'वंदे मातरम', 'भारत माता की जय' अशा देशभक्तीपर घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. प्रत्येकाच्या हातातील तिरंगे ध्वज सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.

या रॅली मध्ये युवा नेते अजय धोंडे, अभयराजे धोंडे, माजी सभापती नियामत बेग, ॲड. रत्नदीप निकाळजे, आजिनाथ गवळी, पांडुरंग नागरगोजे, सईद भाई चाऊस, युवा नेते आस्ताक भाई शेख, सरपंच सावता ससाणे, सतिश झगडे, दादासाहेब जगताप, ज्ञानेश्वर वाघ, अभय गर्जे, आरपीआयचे आष्टी तालुका अध्यक्ष अशोक साळवे, संभाजी जगताप, अरुण सायकड, आण्णासाहेब लांबडे, बबनराव औटे, बाबा साहेब ससाणे, गौतम ससाणे, बबनराव सांगळे, हादी शेख, सदाभाऊ दिंडे, शेख आज्जुभाई, ॲड. विधाते, पदाधिकारी, विविध राजकीय पक्षांचे नेते, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT